**महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा**

## सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग)

**आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,**

**आळंदी रोड, येरवडा, पुणे - ४११ ००६**

सत्यमेव जयते

| | | |
|---|---|---|
| सहसंचालक (वै) (०२०) २९७०५९५३<br>सहसंचालक (का) (०२०) २६६८६९५५<br>उपसंचालक (०२०) २६६८६९५१<br>कार्यालय (०२०) २६६८६९५२-५४-५६ | | विभागवार ईमेल आयडी :-<br>TB Section - stomh@rntcp.org<br>Lep Section- jtlepnms@rediffmail.com<br>Est Section - jdhsest९९@gmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्र.ससंआसे/कुष्ठवक्षय/भांडार/संगणक/प्रिंटर/स्कॅनर/देखभाल करार/ /२५<br>दिनांक २४/०७/२०२५ २८७०-७९ | |


## जाहीर नोटीस

विषय - संगणक, प्रिंटर व स्कॅनरसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार AMC (Annual Maintenance Contract) करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, कार्यालयात विविध कंपनीचे संगणक संच (६० नग), प्रिंटर (४८ नग) व स्कॅनर (३ नग) वापरात आहेत. सदर संगणकीय साहित्य-सामुग्री सुस्थीतीत ठेवण्यासाठी किमान एक वर्षाचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवासंविदेचा करार करावयाचा आहे. तरी इच्छूक स्थानिक निविदाधारकांनी / पुरवठादार यांनी दिनांक०५/०८/२०२५ पर्यंत मा. सहसंचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ यांचे नावे बंद लिफाफयात दरपत्रक निविदा सोबतच्या विहीत नमुन्यातच सादर कराव्यात. सादर करण्यात येणा-या दरपत्रक लिफाफयावर ठळक अक्षरामध्ये **संगणक, प्रिंटर व स्कॅनरसाठीचे दरपत्रक** असा उल्लेख करावा.

### दरपत्रक निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील

१) संगणक, प्रिंटर व स्कॅनरच्या सेवासंविदेचा करार एक वर्षासाठी करावयाचा आहे. वार्षिक देखभाल व दुरुस्ती करारासाठी येणाऱ्या खर्चाची **वार्षिक रक्कम प्रतिनग** दर्शविण्यात यावी.

२) संगणक, प्रिंटर व स्कॅनरची सर्व्हीसिंग आवश्यकतेनुसार करणे अनिवार्य राहिल.

३) संगणक, प्रिंटर व स्कॅनर नादुरुस्त असल्याचे कार्यालयाचे निदर्शनास आल्यास कार्यालयाने कळविल्यानंतर आपले संस्थेच्या तज्ञ इंजिनिअर कडून २ तासात / त्याच दिवशी कार्यालयात तात्काळ येवून दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

४) संगणक / प्रिंटर / स्कॅनरचे संबंधित सर्व सुटे भाग खराब अथवा नादुरुस्त झाल्यास ते दुरुस्त करणे शक्य नसल्यास नवीन पार्ट कक्ष अधिकारी, भांडार शाखा तसेच कार्यालयाचे मान्यतेने बदलण्यात यावेत. नवीन बसविण्यात येणारे सुटे भाग हे नामांकित कंपनीचे असावेत. त्यांची वॉरंटी १ वर्षाची असली पाहिजे. सदरच्या नवीन सुटे भागासाठी येणारा खर्च स्वतंत्रपणे मंजुर करण्यात येईल. त्याबाबत सोबतचे "प्रपत्र - अ व प्रपत्र - ब" मध्ये साहित्याच्या यादी मध्ये दर नमुद करावेत.

५) सदर देखभाल व दुरुस्ती कराराचे देयके करार झाल्यानंतर अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही व यासंबंधी आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही. देयके सादर करताना तीन प्रतीमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

६) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार हा आपली सेवा असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास, कोणतीही लेखी नोटीस न देता अथवा पूर्वकल्पना न देता निर्गमित करण्यात आलेले आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील. संगणक, प्रिंटर व स्कॅनरचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार प्रक्रिया पुर्णपणे रदद् करण्याचे तसेच दिलेले कार्यालयीन आदेश रदद करण्याचे अधिकार सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ यांनी राखुन ठेवले आहेत.

७) सोबत नमुद केलेल्या **विहीत नमुन्यामध्येच** आपले संस्थेच्या / कंपनीच्या लेटरहेडवर अथवा नावाने दरपत्रके सादर करावीत. विहीत केलेल्या नमुन्याव्यतिरिक्त दरपत्रक सादर केल्यास दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी. दरपत्रक सादर करताना आपल्या संस्थेच्या कोणत्याही अटी व शर्ती या कार्यालयास लागू राहणार नाहीत.

८) "प्रपत्र - अ व प्रपत्र - ब" मध्ये संगणक यंत्रणेसाठी लागणा-या साहित्याचे दर नमुद करावेत. सदरचे साहित्याचे दर हे कार्यालयाच्या मागणीनुसार पुढील एक वर्षासाठी निश्चित राहतील. त्याच दराने सदरचे साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल. सदरचे साहित्याचे दर नमुद करताना, बाजारभावानुसार दर सादर करावेत.

९) संगणक, प्रिंटर व स्कॅनरसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (AMC) करणेसाठीचे दरपत्रकांमधील पात्र ठरलेल्या L1 (न्युनतम) पुरवठादाराचे प्रपत्र अ व प्रपत्र ब मधील साहित्याचे दर हे इतर पुरवठादार यांचेपेक्षा अधिक असल्यास अंतिम तुलनात्मक तक्त्यानुसार इतर पुरवठादार यांचेपेक्षा कमी दराने साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

१०) टोनरमध्ये भरण्यात येणारी पावडर/शाई चांगल्या दर्जाची असावी. टोनर रिफिलिंग व आवश्यक ते पार्ट बदलून दिलेल्या टोनरची प्रिंट पुसट येणार नाही याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील. टोनर रिफिलिंग व अनुषंगिक पार्ट दुरुस्त वा बदलून झाल्यास टोनर मधुन आवश्यक किमान समाधानकारक प्रती उपलब्ध न झाल्यास सदरहू टोनर निःशुल्क बदली / दुरुस्त करुन देणे आवश्यक राहील. टोनर कार्ट्रेज रिफीलींग व दुरुतीची कामे ही कार्यालयात करुन देण्यात यावेत.

११) कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे. अंतिम दिनांकानंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही. दरपत्रकासोबत संस्थेचा जीएसटी क्रमांक नोंदणी प्रमाणपत्र / पॅन कार्ड व तदनुषंगिक प्रमाणपत्रे इ.च्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

( डॉ. संदीप सांगळे )
सहसंचालक, आरोग्य सेवा,
(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे - ६

प्रत - या कार्यालयाच्या सुचना बोर्डसाठी
प्रत - विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
https://nhm.maharashtra.gov.in/

# <u>निविदा</u>

## <u>संगणक / प्रिंटर / स्कॅनरसाठी दरकरार फार्म</u>

प्रति,

मा. सहसंचालक, आरोग्य सेवा,
(कुष्ठरोग व क्षयरोग), आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११ ००६

**विषय - संगणक, प्रिंटर व स्कॅनरसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार AMC (Annual Maintenance Contract) करणेसाठी दरपत्रके सादर करणेबाबत**

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ (खुदद) येथील संगणक / प्रिंटर / स्कॅनर साठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आमची संस्था / कंपनी नोंदणीकृत असून संगणक क्षेत्रातील कामाचा आम्हाला अनुभव असून खालील ठिकाणी करार केलेला असून सदरचे कामकाज आम्ही केलेले आहे.

| अ.क्र. | संस्थेचे / कंपनीचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६ (खुदद) येथील संगणक / प्रिंटर / स्कॅनर साठी वार्षिक देखभाल दुरुस्ती करार AMC (Annual Maintenance Contract) करण्यासाठी आमची कंपनी **<u>प्रति साहित्य वार्षिक</u>** खालीलप्रमाणे दर आकारणार आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | प्रति नग वार्षिक देखभाल दुरुस्तीचे दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १ | संगणक (सर्व प्रकारचे ) | |
| २ | प्रिंटर (विविध सर्व प्रकारचे) | |
| ३ | स्कॅनर (विविध सर्व प्रकारचे) | |

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

" प्रपत्र - अ "

## संगणक यंत्रणेसाठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

| अ.क्र. | साहित्याचे नाव | नग | दर सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १ | Wired Key Board | १ | |
| २ | Wired Mouse | १ | |
| ३ | Wireless keyboard and Mouse combo | १ | |
| ४ | SMPS power supply | १ | |
| ५ | Motherboard | १ | |
| ६ | RAM ४GB DDR३ | १ | |
| ७ | RAM ४GB DDR४ | १ | |
| ८ | RAM ८GB DDR३ | १ | |
| ९ | RAM ८GB DDR४ | १ | |
| १० | CPU MOTHERBOARD FAN | १ | |
| ११ | Monitor १९" | १ | |
| १२ | CMONS BATTERY | १ | |
| १३ | Quick Heal Antivirus Pro १ year | १ | |
| १४ | External Hard disk १TB (Seagate) | १ | |
| १५ | PEN DRIVE ३२ GB | १ | |
| १६ | PEN DRIVE ६४ GB | १ | |
| १७ | SSD २५६GB | १ | |
| १८ | D-Link Internet Switch ८ port | १ | |
| १९ | HP Printer Tonner Original<br>(Tonner Number - १२ए, ३५, ३५, ८८ए) | १ | |
| २० | HP Printer Tonner Compatible<br>(Tonner Number - १२ए, ३५, ३५ए, ८८ए) | १ | |
| २१ | Canon Printer Tonner Original<br>(Tonner Number - ३३७, ९२५, ३२६, ०५१) | १ | |
| २२ | Canon Printer Tonner Compatible<br>(Tonner Number - ३३७, ९२५, ३२६, ०५१) | १ | |

" हमीपत्र "

"उपरोक्त प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या साहित्याचे दर हे बाजारभावापेक्षा अधिक (अवाजवी) अथवा अवास्तव नाहीत याबाबत हमी देण्यात येत आहे. "

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

## " प्रपत्र - ब "

# प्रिंटरचे टोनर साठी लागणा-या साहित्याचे वार्षिक दर

| अ.क्र. | कंपनीचे नाव | टोनर क्रमांक | साहित्याचे नाव / बाब | प्रती साहित्य प्रती नग वार्षिक दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|
| १ | एचपी (१९ नग)<br>कॅनॉन (२८ नग) | १२ए, ३५, ३५ए, ८८ए<br>३३७, ९२५, ३२६, ०५१ | Toner Refilling | |
| २ | | | Magnet Roller | |
| ३ | | | Drum | |
| ४ | | | Dr. Blade | |
| ५ | | | Wiper Blade | |

## " हमीपत्र "

"उपरोक्त प्रपत्र ब मध्ये नमुद केलेल्या साहित्याचे दर हे बाजारभावापेक्षा अधिक (अवाजवी) अथवा अवास्तव नाहीत याबाबत हमी देण्यात येत आहे. "

आपला

(नाव/सही/कंपनीचा/संस्थेचा शिक्का)

# दरपत्रक निविदेचा कालावधी खालीलप्रमाणे

| अ.क्र. | निविदा प्रक्रिया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | २८-०७-२०२५ |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | २८-०७-२०२५ ते ०५-०८-२०२५ |
| ३ | संगणकीय साहित्य पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | २८-०७-२०२५ ते ०५-०८-२०२५ |
| ४ | निविदा उघडण्याचा संभाव्य दिनांक | ०६-०८-२०२५ |